# प्रकरण चार

## वित्त विभाग

**4.651 13 वा वित्त आयोग (जनरल परफार्मंस ग्रँट व जनरल बेसिक अनुदान) जिल्हा परिषद, ठाणे खात्यातील प्रलंबित धनादेशाची रक्कम शासन खाती भरणा न केलेबाबत.**

**पंचायत समिती वाडा, जिल्हा पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, वाडा येथील सन 2016-2017 चे लेखापरीक्षणात, लेखा विभागाकडील 13 वा वित्त आयोग, जिल्हा परिषद, ठाणे कडील जनरल परफॉरमन्स अनुदानाची किर्दीची पडताळणी केली असता रोखवही व बँक पासबुकात दिनांक 31/03/2017 अखेर एकूण रक्कम रुपये 2,80,825/- चे धनादेश तर जनरल बेसिक किर्दीतील एकूण रक्कम रुपये 74,679/- चे धनादेश शासन खाती भरणा न केली असल्याचे आढळून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 13 वा वित्त आयोग निधी, जिल्हा परिषद, ठाणे कडील (जनरल परफॉरमन्स अनुदान) निधी किर्दीची पडताळणी केली असता उपरोक्त तपशीलात नमूद केलेप्रमाणे एकूण रक्कम रूपये 2,80,825/- चे धनादेश व आयकर, सेल टॅक्स, रॉयल्टी, विमा खाती भरणा करावयाच्या रक्कमांचे असून सदर धनादेश वेळीच व जनरल बेसिक अनुदान किर्दीतील एकूण रक्कम रूपये 74,679/- चे धनादेश दिनांक 31/03/2017 अखेर व लेखा तपासणी दिनांक 24/08/2017 अखेर शासन खाती भरणा केले नसल्याचे आढळून आले आहे. सदर बाब गंभीर स्वरूपाची आहे. तरी सदर धनादेश वेळीच शासन खाती भरणा करण्याची कार्यवाही का करण्यात आली नाही, याबाबत खुलासा करावा.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 31(1) नुसार सदरचे धनादेश विधीग्राह्य केल्यानंतरही पुढील सहा महिन्यांपेक्षा जादा कालावधीत शासन खाती भरणा केलेले नाहीत. तरी शासन खाती भरणा न करण्याचे हे प्रयोजन काय, याबाबत खुलासा करावा.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 57 नुसार तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ वटविण्यात न आलेले धनादेश गट विकास अधिकारी यांचे निदर्शनास आणून देणे आवश्यक होते. तथापि, अशी कार्यवाही केली असल्याचे आढळून आले नाही. तरी याबाबतचा खुलासा करावा.

4) सदरचे धनादेश वेळीच शासन खाती भरणा न केल्यामुळे शासनाचे त्यापासून मिळणाऱ्या व्याजाचे नुकसान झाले आहे. याबाबत संबंधितांवर जबाबदारी का निश्चित करू नये, याबाबत खुलासा करावा.

5) सदर खाती सन 2016-2017 या कालावधीत जमा झालेली व्याजाची अखर्चित रक्कम शासन खाती भरणा करून अनुपालन लेखापरीक्षणास दाखवावे.

**4.652 कुटुंब निवृत्ती रक्कम जादा प्रदानाबाबत**

**पंचायत समिती तलासरी, जिल्हा पालघर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती, तलासरी येथील वर्ष 2016-2017 चे लेखापरीक्षणात निवृत्ती वेतनाचे नमूद केलेले अभिलेखे तपासले असता खालील अनियमितता आढळुन आल्या:-

1) श्रीमती पार्वती चंद्रकांत मेघवाले ह्यांना अनुकंपा तत्वावर त्यांच्या मयत नवऱ्याच्या जागी शिपाई पदाचे आदेश ठाजिप/साप्रवि/आ-4/413, दिनांक 03/04/2001 नुसार दिलेले आहेत व त्या आदेशानुसार त्या दिनांक 12/04/2001 रोजी शिपाई पदावर हजर होवून कार्यरत आहेत.

2) श्रीमती लता धर्मेंद्र चौधरी ह्यांची नियुक्ती परिचर पदावर अनुकंपा तत्वावर त्यांच्या मयत पतीच्या जागी मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे यांचे आदेश क्रमांक साप्रवि/आस्था/3क/484, दिनांक 20/05/1995 अन्वये नियुक्ती झालेली असून त्या दिनांक 24/05/1995 पासून ह्या पदावर कार्यरत आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत:-

1) मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या विधवा पत्नीस अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत / जिल्हा परिषद सेवेत समाविष्ट केल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 नुसार मयत इसमाची पत्नी सेवेत ज्या

दिवसापासून कार्यरत आहे, त्या दिवसापासून त्यांच्या कुटुंब निवृत्ती वेतनात महागाई भत्ता रक्कमेची अदागई न करता श्रीमती पार्वती चंद्रकांत मेघवाले ह्यांना फेब्रुवारी 2016 ते मे 2017 च्या कालावधीपर्यंत मूळ पेन्शन व त्यावरील महागाई भत्ता रक्कम मिळून होणारी एकूण निवृत्ती वेतनाचे प्रदान केलेले आहे. तसेच श्रीमती लता धर्मेंद्र चौधरी ह्यांना सुद्धा वरीलप्रमाणे फक्त मूळ निवृत्ती रक्कम अदा करणे आवश्यक असतांना असे न करता माहे फेब्रुवारी 2016 ते जुलै 2017 पर्यंत मूळ पेन्शन रक्कम व त्यावरील महागाई भत्ता रकमेचे प्रदान केलेले आहे.

तरी संबंधितांना अदागई केलेली महागाई भत्ता रक्कम रुपये अनुक्रमे रूपये 56,437/- व 64,047/- अशी एकूण रक्कम रूपये 1,22,906/- जादा प्रदान रक्कमेचे त्यांचेकडून वसुली करुन शासन जमा करुन पूर्तता दर्शवावी. सोबत निवृत्ती वेतन प्रदानाबाबतचे विवरण पत्र 6 जोडलेले आहे.

**4.653 ठेवीबाबत.**

**पंचायत समिती तासगाव, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, तासगावचे सन 2016-2017 चे लेखापरीक्षण करताना अनामत नोंदवहीची पडताळणी करून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 211 नुसार ठेव खाती कोणत्याही अनुदानाची रक्कम मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची मान्यता घेतल्याशिवाय ठेवता येत नसताना रक्कम रूपये 40,04,750/- शासन अनुदानाच्या रकमा ठेव खाती ठेवल्या आहेत.

2) अनामती सोडून अनामत नोंदवहीत इतर नोंद केलेल्या रक्कम कशाच्या आहेत? याचा तपशील नोंद नाही.

**4.654 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील कपात रक्कमांबाबत**

**पंचायत समिती तासगाव, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 28) -** पंचायत समिती, तासगाव सन 2016-2017 चे लेखापरीक्षण करताना परिभाषित अंशदाई निवृत्ती वेतन योजनाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 01/11/2005 नंतर सेवेत रुजू झालेल्या कर्मचारी यांना DCPS ही योजना लागू झाल्यामुळे त्यांचे वेतनातून 10 टक्के एवढी रक्कम कपात करून ती त्यांचे खाती जमा करणेसाठी खाते क्रमांक देणे आवश्यक होते. तथापि, अद्याप खालीलप्रमाणे 23 एवढ्या शिक्षकांना खाते क्रमांक दिलेले नसल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली आहे. तसेच त्यांच्या वेतनातून DCPS वर्गणी कपात केली जात नाही, ही बाब नियमबाह्य आहे.

2) शिक्षकांना खाते क्रमांक दिले असून त्यांचे वेतनातून DCPS रक्कम रूपये 1,58,08,276/- एवढी कपात केली आहे. ती कोठे जमा केली? याबाबतची कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे रक्कम त्यांचे खातेवर जमा झाली असलेची खात्री करता आली नाही.

3) 106 एवढ्या शिक्षकांना खाते क्रमांक दिले आहेत. तथापि, अद्याप EMPLOYER शेअर त्यांचे खात्यावर जमा केलेला नाही. त्यामुळे शिक्षक कर्मचारी यांचे व्याजाचे नुकसान होत आहे. त्यामुळे रक्कम प्रदान करतेवेळी अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. तरी EMPLOYER शेअर व व्याज त्यांचे खात्यावर जमा करणेची कार्यवाही झाल्याबाबतची पूर्तता पूर्तता दाखवावी

**4.655 अनुदान रक्कमा डीपॉझीटला ठेवलेबाबत**

**पंचायत समिती खानापूर विटा, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 5) -** पंचायत समिती, खानापूर सन 2016-2017 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण करीत असताना अनामत नोंदवहीची पडताळणी करून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण/1002/प्र.क्र.128/आर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार अखर्चित निधी पुढील आर्थिक वर्षापर्यंत खर्च करण्यासाठी कार्यप्रणाली विषद केली आहे. परंतु, त्यापेक्षा जास्त

कालावधीसाठी अनुदान अखर्चीत राहिल्यास शासनास भरणा करणे आवश्यक आहे. तरी रक्कम रूपये 53,162/- शासन भरणा करून पूर्तता दाखववावी. याबाबत वारंवार आक्षेप घेवूनही त्याची पुनरावृत्ती होत आहे अखार्चीत शासन अनुदान शासन खाती भरणा करून पूर्तता दाखववावी.

**4.656 परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेतील कपात रक्कमांबाबत**

**पंचायत समिती खानापूर विटा, जिल्हा सांगली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती, विटा सन 2016-2017 चे लेखापरीक्षण करताना परिभाषित अंशदाई निवृत्तीवेतन योजनाबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षकांना खाते क्रमांक दिले असून त्यांचे वेतनातून DCPS रक्कम कपात केली आहे, ती त्याचे DCPS खात्यावर जमा होणे आवश्यक आहे. तथापि, सदर रक्कम त्याचे DCPS साठी जमा केलेबाबत पोहोच उपलब्ध नसल्याने सदर रक्कम कोणत्या खाती जमा केली. तसेच त्या रक्कमेच्या व्याजाच्या रक्कमेचे नुकसान होणेची शक्यता आहे. तरी याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे:-

2) अंशदायी निवृत्ती वेतन (DCPS) योजनेअंतर्गत दिनांक 01/11/2005 नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे लेखे ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्रमांक अंनिया/1007/प्र.क्रं.181/ आस्था-11, दिनांक 21/05/2010 अन्वये अद्यावत ठेवणे आवश्यक आहे. तथापि, तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे दिनांक 01/11/2005 नंतरच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात रक्कम त्यांच्या नियुक्ती दिनांकापासुन होत असल्याची खात्री करता आली नाही. तरी संपुर्ण अभिलेख्यासह खर्चाची खात्री करून द्यावी.

3) गटविकास अधिकारी यांनी पंचायत समिती स्तरावर नियंत्रण ठेवणेचे असताना ठेवले नसल्याचे दिसून येते.

**4.657 शालेय दप्तर तपासणी अंती तालुक्यातील शाळांकडे अखर्चित राहिलेल्या रक्कमेबाबत.**

**पंचायत समिती आजरा, जिल्हा कोल्हापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** लेखापरीक्षणाने अर्धसमास पत्र क्रमांक 40 दिनांक 17/10/2017 अन्वये खालील नमुद आक्षेपाबाबत उत्तर मागवले होते. मात्र संबंधित संस्थेचे अर्धसमास पत्रास उत्तर प्राप्त झाले नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2016-2017 लेखापरीणाकरीता पंचायत समिती, आजरा अंतर्गत तालुक्यातील शाळांची दप्तर तपासणी केली असता 30 शाळांकडे शालेय गणवेश, शालेय पोषण आहार, वेतन, सादीलखर्च इत्यादी करीता वितरीत करण्यांत आलेला निधी तसेच बँकेने जमा रक्कमेवर दिलेल्या व्याजाची रक्कम इत्यादी. अदयापपर्यंत रक्कम रुपये 1,38,664/- अखर्चित असल्याचे व त्यांचे बँक खातेवर तशीच जमा ठेवलेचे निदर्शनास आले.

1) सदर शाळांना सन 2016-2017 करीता अनुदान मंजुरी प्राप्त झालेली होती. त्याप्रमाणे त्यांनी सदरील रक्कम खर्च करणे अपेक्षित होते. तसे न होता उपरोक्त शाळांनी सदरील अखर्चित रक्कम स्वत:च्या बँक खात्यावर तशीच जमा ठेवलेली आहे.

2) महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1002/प्र.क्रं.128/आर्थोपाय, दिनांक 06/06/2008 प्रमाणे अखर्चित राहिलेला निधी स्वायत्त संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक आहे.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे परिशिष्ट-4 नियम-2 नुसार प्राप्त रक्कम / अनुदान हे मागील दायित्व व चालु खर्च भागविण्यासाठी असुन त्यातुन दिनांक 31 मार्च पर्यंत खर्च करता येतो व त्यानंतर अखर्चित राहिलेली रक्कम व्यपगत होते. अशी अखर्चित रक्कम शासन खाती भरणा करणे आवश्यक आहे.

**4.658 कै. श्री. व्ही. बी. हंबीरे, यांच्या वारसांना तात्पुरत्या कुटूंब निवृत्तीवेतन अदाईबाबत**

**पंचायत समिती मंगळवेढा, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती मंगळवेढा कडील सन 2016-2017 चे लेखापरीक्षणावेळी निवृत्तीवेतन प्रदान प्रकरणांची तपासणी केली असतां कै.श्री.व्ही.बी.हंबीर यांच्या वारसांना माहे ऑगस्ट 2015 पासून लेखापरिक्षण कालावधीपर्यंत (25 महिने) प्रति माह रुपये 4,900/- तात्पुरते कुटूंब निवृत्तीवेतन प्रदान होत आहे या तात्पुरत्या कुटूंब निवृत्ती वेतनातून रुपये 4,000/- वसुली केली जात आहे. कुटूंब निवृत्तीवेतन एकूण रुपये 8,65,068/- वसुली निश्चित केलेली आहे. आजपर्यंत रूपये 97,000/- वसुल करण्यांत आले आहे. उर्वरित रुपये 7,68,068/- वसुल होणे बाकी आहे. वसुलीची रक्कम मोठा प्रमाणात आहेत. त्यांच्या सर्व देय रकमांतून वसुली करुनही पुन्हा कुटूंब निवृत्ती वेतनातून वसुली करावे लागेल त्यामुळे नियमित निवृत्तीवेतन आदेश त्वरीत प्राप्त करुन घेणे आवश्यक आाहे इतक्या दीर्घ कालावधीकरीता तात्पुरते कुटूंब निवृत्तीवेतन कोणत्या आधारे प्रदान केली जात आहे? याचा खुलासा करावा. याबाबत वरीष्ठ कार्यालयांस पत्रव्यवहार करुन लवकरात लवकर नियमित निवृत्तीवेतन आदेश प्राप्त करुन घेणे आवश्यक आाहे.

**4.659 ठेव नोंदवही व ठेव रक्कमेबाबत.**

**पंचायत समिती पंढरपूर, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 11) -** पंचायत समिती, पंढरपूर यांचेकडील सन 2016-2017 चे लेखापरीक्षण कालावधीत ठेव नोंदवही (जिल्हा परिषद सेस व संकिर्ण) तपासणी केली असता दिनांक 31/03/2017 अखेर ठेव खाती रक्कमा पंचायत समितीकडे बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित व शिल्लक असल्याचे आढळून आले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र लेखा संहिता 1968 मधील नियम 218 नुसार ठेवीच्या लेखाशीर्षाखाली जमा करण्यात येणार नाहीत, अशा रकमांचा तपशिल नमुद करण्यात आलेला आहे. त्यात प्रामुख्याने महसुली शिर्षाखाली ज्यांची नोंद करणे स्पष्टपणे शक्य असेल, अशा रकमांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतू, पंचायत समिती, पंढरपूर यांचेकडील ठेव नोंदवहीची (संकिर्ण) पडताळणी केली असता रक्कम रूपये 10,06,354/- महसुली जमा ठेव खाती ठेवण्यात आली आहे. तरी सदर रकमा योग्य त्या शासन लेखाशिर्षाखाली व्याजासहित जमा केल्याचे लेखापरीक्षणास दर्शवावे.

2) सन 2012-2013 ते 2016-2017 या कालावधीतील जिल्हा परिषद सेस थकीत ठेव रक्कम रूपये 63,53,509/- दिनांक 31/03/2017 अखेर शिल्लक असून सदरबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 219 नुसार तीन वर्षावरील सर्व थकीत ठेव रक्कमा व्यपगत करुन योग्य त्या लेखा शिर्षाखाली जमा करणे आवश्यक असता तशी कार्यवाही करणेत आलेली नाही. तरी सदरचे अनियमिततेबाबत योग्य तो खुलासा सादर करावा व उपरोक्त नमुद केलेनुसार तीन वर्षावरील जिल्हा निधीकडील एकूण थकीत ठेव (शासन निधी वगळून) व्यपगत करुन योग्य त्या लेखा शिर्षाखाली जमा केलेची पूर्तता लेखापरीक्षणास दाखवावी.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 219 नुसार वर्षाच्या अखेरीची ठेवीची कोणतीही रक्कम ती परत देय झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षे मुदतीपर्यंत हक्क न सांगता राहिली असेल, तर महसुली लेखाशीर्षाखाली जमा करण्यात येईल. परंतू, अशी जमा करण्यात आलेल्या ठेवी स्थायी समितीच्या मंजूरीशिवाय परत देण्यात येणार नाहीत.

**4.660 सेवेत असतांना निवृत्तीवेतनांवर महागाई भत्ता प्रदान/दुबार निवृत्तीवेतन अंशराशीकरणानंतर निवृत्तीवेतन कमी दराने प्रदान न केल्याने झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती सांगोला, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिती, सांगोलाचे सन 2016-2017 चे लेखापरिक्षणावेळी निवृत्तीवेतन प्रदान तपासणी केले असतां निवृत्ती वेतनधारकांना जादा निवृत्तीवेतन प्रदान झाल्याने त्यांची वसुली चालू असल्याचे दिसून आले याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) निवृत्ती वेतनधारकांना जादा निवृत्तीवेतन प्रदान झाल्याने त्यांची वसुली चालू असल्याचे दिसून आले अतिप्रदान रकमेची वसुली निवृत्तीवेतनातून चालू आहे परंतु, संबंधितांना कोणत्या कालावधीपासून किती रक्कम जादा प्रदान झाली आहे? याचे विवरणपत्र देयकांसोबत नाही अथवा लेखापरिक्षणांस सादर केले नाही.(याबाबत

विचारणा केली असतां त्यांना माहे ऑगस्ट 2011 ते जून 2016 या 59 महिन्यांकरता जादा प्रदान झाल्याचे सांगण्यात आले, परंतु याबाबत लेखे तपासणीस सादर केले नाही.) वरीलप्रमाणे वसुलीचे किती हप्ते आहेत? वसुल किती हप्ते झाले व उर्वरीत किती हप्ते वसुलीचे शिल्लक आहेत? याची तपासणी करता आले नाही. तरी आता उपरोक्त 34 निवृत्तीवेतन धारकांचे पीपीओ सादर करुन जद्दा प्रदान रकमेचे (प्रत्येकी दिलेले व देय निवृत्तीवेतन ) तपशिल सादर करुन जादा प्रदान वसुली बरोबर असल्याची खात्री पटवावे.

2) वरीलप्रमाणे जादा प्रदान चाचणी लेखा परिक्षणांत आढळून आली असल्याने सर्व निवृत्तीवेतन धारकांचे पीपीओ व प्रत्यक्षात अदा करण्यांत आलेले निवृत्तीवेतन याची तपासणी करुन वरीलप्रमाणे जादा प्रदान झाली नसल्याचे खात्री करण्यांत यावे. जादा प्रदानाची प्रकरणे आढळल्यास त्याची वसुली करण्यांत यावे. वरीलप्रकारे जादा प्रदान सर्व प्रकरणांची वसुली केल्याचे प्रमाणपत्र सक्षम अधिका-यांनी प्रमाणपत्र देऊन अनुपालन करावे.

3) अतिप्रदान रकमा शासनखाती भरणा केल्याचे दर्शवावे.

**4.661 पंचायत समितीकडील सर्व निधीचा बँक ताळमेळ न घेतलेबाबत.**

**पंचायत समिती करमाळा, जिल्हा सोलापूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती, करमाळा सन 2016-2017 कालावधीतील जिल्हा निधी, अभिकरण निधी, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस व हातपंप व देखभाल दुरुस्ती निधीमध्ये दिनांक 31/03/2017 च्या अखेरची कॅशबुक व बँक शिल्लकेत तफावत दिसून येत आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, करमाळा जिल्हा निधी सन 2016-2017 वरील सर्व निधीचे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 57 नुसार बँक ताळमेळ पत्रक तयार करुन कॅशबुकला डकविणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. न वटलेल्या धनादेशांची यादी काढण्यात आलेली नाही. त्यांमुळे कॅशबुकमधील शिल्लक्क, बँकपासबुक मधील शिल्लक दर्शविलेली तफावत यामध्ये ताळमेळ होत नाही.

2) पंचायत समितीने रोकडवहीत न वटलेल्या धनादेशाची यादी जोडण्यात आलेली नाही. त्यांमुळे न वटलेले धनादेश किती रकमेचे आहेत? याबाबत लेखापरीक्षणास तपासणी करता आलेली नाही. तसेच न वटलेले धनादेश तीन महिन्यापेक्षा जास्त राहणार नाहीत, याकडे गटविकास अधिकारी यांनी व्यक्तीश: लक्ष घालणे गरजेचे आहे. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आली नाही.

3) पंचायत समितीने रोजच्या रोज कपातीच्या रकमांचे धनादेश काढण्यात आलेले नाही. त्यांमुळे कपातीच्या रकमांचे धनादेश काढणे राहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही

4) जिल्हा निधी रोकडवहीत मोठया प्रमाणावर खाडाखोड व उपरीलेखन दिसून येते. तसेच ब-याच ठिकाणी शीस पेन्सिलने रकमा लिहिलेल्या दिसून येत आहेत. त्यांमुळे सदर रकमा योग्य व बरोबर असलेबाबत लेखापरीक्षणास खात्री करता येत नाही. जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 12 नुसार रोकडवहीतील प्रत्येक दुरुस्ती किंवा लेख्यातील बदल शाईने करणे आवश्यक आहे (मुळ नोंदीवर एक रेष ओढून दुरुस्तीवर गटविकास अधिकारी यांनी दिनांकासह साक्षांकित करणे आवश्यक आहे.) परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही.

5) तेरावा वित्त आयोग निधीची सन 2015-2016 मधील अखेरची शिल्लक निरंक आहे. सन 2016-2017 मध्ये ग्रामपंचायतींनी 13 वा वित्त आयोगाचे शिल्लक रकमा भरणा केलेल्या दिसून येतात. परंतु, तेरावा वित्त आयोग रोकडवहीमध्ये दिनांक 31/03/2017 अखेर जमा खर्च बाबतच्या सर्व नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत व बॅक स्क्रोल लेखापरीक्षणास सादर केलेले नाही. त्यांमुळे लेखापरीक्षणास अखेरच्या शिल्लकेशी ताळमेळ घेता येत नसल्याने 13 वा वित्त आयोग रोकडवही प्रमाणित करता येत नाही. तरी तेरावा वित्त आयोग रोकडवहीतील सर्व अदयावत नोंदी घेऊन बँक ताळमेळ घेण्यात यावा.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 57 नुसार बँक ताळमेळ न घेतल्यामुळे हातपंप, पंचायत समिती सेस, जिल्हा परिषद सेस, अभिकरण निधी व जिल्हा निधी यांचे रोकडवहीतील जमा व खर्चाची महिनानिहाय प्रत्यक्ष शिल्लक व रोकडवहीतील महिनानिहाय शिल्लक यामध्ये तफावत

दिसून येत आहे. तरी सदरबाबत लेखापरीक्षणास समर्पक खुलासा करुन कमी/जादा तफावत रकमेबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**4.662 ग्रामपंचायत अफरातफर प्रकरणांबाबत.**

**पंचायत समिती वाशिम, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 37) -** ग्रामपंचायत स्तरावरील अफरातफर प्रकरणांची माहिती पंचायत विभागाकडुन प्राप्त झालेली आहे. यामध्ये ग्रामनिधीची मार्च 2017 अखेर 109 प्रकरणे प्रलंबीत असुन त्यामध्ये गुंतलेली एकुण रक्कम 1,82,48,259/ आहे इतर निधींची प्रकरणे जवाहर रोजगार योजना, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना या निधींची गुंतलेल्या रक्कमांची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध केली नाही. एवढी रक्कम अफरातफर प्रकरणांमध्ये गुंतलेली असतांना त्याबाबत वसुलीची कुठलीही कार्यवाही केलेली आढळत नाही. सन 2016-2017 या आर्थीक वर्षात केवळ 24 प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम रूपये 17,14,044/ निकाली काढलेली आहेत.

प्रकरण निपटारा करण्यास होत असलेल्या विलंबामुळे ग्रामपंचायत स्तरावरील अफरातफर प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम संबंधीत ग्रामसेवक/सरपंच यांचेकडून वसुल होण्याची प्रलंबीत असुन याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे एवढ्या मोठ्या रक्कमेपासुन ग्रामपंचायत वंचीत राहत असुन सदर रक्कमेअभावी त्यांची विकास कामे करता येत नसल्याने त्यापासुन त्या त्या गावातील जनता योजना/कामांच्या लाभापासुन वंचीत राहत आहे. ही बाब गंभीर स्वरुपाची असुन यासाठी पंचायत समिती स्तरावरील पंचायत विभाग कार्यरत असुन देखील कुठलीही कार्यवाही झालेली नाही.

प्रकरणांशी संबंधीत बरेचशे कर्मचारी शासकीय सेवेत कार्यरत असुन त्यांचे वेतन व भत्ते नियमीतपणे अदा करण्यात येत आहेत. परंतु, त्यांचेकडील वसुलीसाठी कोणतीही ठोस कार्यवाही, प्रयत्न केले जात नाही. संबंधीतावर जबाबदारी निश्चित करुन वेतनातुन सहज वसुली केली जावू शकते. परंतु, त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत नाही. संबंधीत बाबीकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करण्यात येत असल्याची शक्यता नाकारता येत नाही. वसुली होत नसल्याने संबंधीतांना त्याचे गांभीर्य कळत नाही व याप्रमाणे अफरातफर प्रकरणांच्या संख्येमध्ये वाढच होत आहे, ही बाब योग्य नाही.

**4.663 ग्रामपंचायतचे अफरातफर प्रकारणाबाबत**

**पंचायत समिती रिसोड, जिल्हा वाशिम, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 24) :-** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

ग्रामपंचायतीचे सन 2016-2017 पर्यंत एकूण 107 प्रलंबित अफरातफर प्रकरणांचा पंचायत विभागाने जलद गतीने निपटारा न केल्यामुळे त्यामध्ये रूपये 2,19,52,101/- एवढया मोठया प्रमाणात रकमा गुंतुन पडलेल्या आहेत. त्यामुळे शासनाचे महसुलाचे आर्थिक नुकसान होत असल्याचे निदर्शनास येते. सबब प्रलंबित प्रकरणे तत्पर निकाली काढण्याचे दृष्टीने उचित कार्यवाही करुन नोंदवहया अदयावत करुन अनुपालन सादर करावे.

**4.664 अभिकरण निधीची रक्कम रोखपुस्तकांत न घेणेबाबत.**

**पंचायत समिती वर्धा, जिल्हा वर्धा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 2) -** सदरबाबत रक्कम रूपये 1,87,50,448/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समितीचे सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणात अभिकरण निधीचे रोखपुस्तकांची तपासणी केली असता दिनांक 31/03/2017 अखेर रोखपुस्तकांत रूपये 1,42,76,529/- अखेरची शिल्लक असल्यांचे दाखविले आहे व रोखपुस्तकांतली अखेरची शिल्लक असलेली रक्कम स्टेट बँक आफ इंडिया चे खात्यामध्ये असल्याचे दर्शविले आहे. रोखपुस्तकांत जोडलेल्या गोषवा-यांनुसार मध्यवर्ती बँकेंत रूपये 1,45,30,628/- असल्यांचे दर्शविले आहे. परंतु, सदरची रक्कम रोखपुस्तकांत दिसत नाही. तसेच अभिकरण निधीचे डी.सी.सी.बँकेचे बैंक स्क्रोल तपासले असता रूपये 1,87,50,448/- शिल्लक आहे. रोखपुस्तकांत जोडलेल्या गोषवा-यामध्ये मध्यवर्ती बँकेत असलेली रक्कम रूपये

1,45,30,628/- व प्रत्यक्ष बँक स्क्रोल मध्ये असलेली रक्कम रूपये 1,87,50,448/- यामध्ये रूपये 2,19,820/- ची तफावत आहे. मध्यवर्ती बँक मध्ये असलेली रक्कम रूपये 1,87,50,448/- अभिकरण निधीच्या रोखपुस्तकांत का घेतलेली नाही व लेख्याबाहेर का ठेवण्यात आली? अर्धसमास पत्र क्रमांक 5, दिनांक 08/08/2017 अन्वये विचारणा केली असता खुलासा सादर केलेला नाही.

**4.665 एकाच देयकाचे प्रदान करणेकरिता दोन वेगवेगळया धनादेशाद्वारे रक्कम रोखीने आहरित करणेबाबत.**

**पंचायत समिती तुमसर, जिल्हा भंडारा सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 27) -** सदरबाबत रक्कम रूपये 41,220/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रमाणक क्रमांक 91 अंतर्गत बील 833 दिनांक 11/01/2017 अन्वये मनोज आर्टस, तुमसरकडून संवाद पथक मोहिमेकरिता (3x5 फुटाचे) डिजीटल बॅनर प्रती चौरस फुट रूपये 12/- प्रमाणे एकूण 229 नगाकरिता प्रती नग रूपये 180/- प्रमाणे एकूण रक्कम रूपये 41,220/- ची खरेदी करण्यात आली. सदर रक्कम रूपये 41,220/- चे प्रदान पुरवठादाराला एकमुस्त रक्कमेच्या धनादेशाद्वारे न करता दोन वेगवेगळया क्रमांकाच्या धनादेशाद्वारे प्रदान करण्यात आल्याचे विभागाचे बँक खाते पुस्तकावरून आढळले. त्यातील एक धनादेश 11424 दिनांक 02/02/2017 अन्वये रूपये 17,220/- मनोज सेलोकरचे नावाने रोखीने आहरित करण्यात आला आहे व दुसरा धनादेश 11423 दिनांक 04/02/2107 ला रूपये 24,000/- मनोज सोनकरचे खात्यात ट्रान्सफर केल्याचे पासबुकावरून आढळले.

सदर दिनांकास विभागाचे बँक खात्यात रूपये 4,60,715/- एवढी रक्कम शिल्लक असताना एकमुस्त रक्कम रूपये 41,220/- पुरवठादाराला प्रदान करता दोन वेगवेगळया रकमेचे धनादेशाने खर्च करण्याचे प्रयोजन काय? याचा खुलासा लेखापरिक्षणास झाला नाही.

2) रक्कम प्राप्त झाल्याची मुद्रांकित पोच लेखापरिक्षणास प्राप्त झाली नाही.

3) सदर खरेदीच्या निविदा तपासल्या असता निर्मल ग्राफिक्स, तुमसर व जयंत आर्टस, तुमसर या पुरवठादारांनी विहित बीलाचे नमून्यात दर न देता लेटरपॅडवर दर दिले आहेत

4) खरेदी केलेले 229 नग बॅनर कोणाला वितरित केले? याचा तपशील लेखापरिक्षणास प्राप्त झाला नाही.

5) लेखापरिक्षणास साठा नोंदवही उपलब्ध न झाल्याने साठा नोंदवहीत नोंद घेतल्याची खात्री लेखापरिक्षणास करता आली नाही.

**4.666 शासन निधीची अखर्चित मुदतबाह्य धनादेशाची रक्कम मागणी नसताना रोखपुस्तकात जमा दर्शवून सहाय्यक विस्तार अधिकारीयांचे नावे नवीन धनादेश खर्च दर्शवून जिल्हा निधीत नियमबाह्य वळती करणेबाबत.**

**पंचायत समिती धानोरा, जिल्हा गडचिरोली, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 8) -** सदरबाबत रक्कम रूपये 3,62,758/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण 1002/प्र.क्र.128/अर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार लगतच्या (पुढील) आर्थिक वर्षाअखेर पर्यंत योजनांचा खर्च करण्यायोग्य असलेल्या लेखाशीर्षाखालील रक्कम वरिष्ठ कार्यालयाकडून अनुमती घेऊन खर्च करण्यात यावे. असे असताना वरीलप्रमाणे रक्कम स्वतःचेच अधिकारात प्रत्यक्ष ज्या लेखाशीर्ष खर्चाची मागणी नसताना तसेच असलेल्या मुदतबाह्य अखर्चित रक्कम शासन जमा करणे आवश्यक असताना तसे न करता जिल्हा निधी 11 संकीर्ण ठेवी यामध्ये नियमबाह्य वळती केल्याने शासन निधीचे नुकसान केले आहे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून दंडनीय व्याजासह रक्कम वसूल करून शासन खाती जमा दर्शवावी व अनुपालन दर्शवावे

**4.667 दीर्घकाळ विविध निधींची अखर्चित रक्कम पंचायत समिती स्तरावर ठेवल्याने झालेल्या नुकसानीबाबत.**

**पंचायत समिती उदगीर, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 4) -** पंचायत समिती, उदगीर च्या सन 2016-2017 च्या लेखापरीक्षणामध्ये पंचायत समितीकडील विविध योजनांच्या रोजकिर्दची पडताळणी केली

असता दिर्घकाळापासून पंचायत समिती स्तरावर विविध बँकेच्या खात्यामध्ये शासकीय योजनेचा निधी अनावश्यकरीत्या पडून शिल्लक असल्याचे दिसून येते. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समिती, उदगीर यांचे सन 2016-2017 मध्ये पंचायत समितीकडे एका वित्तीय वर्षात म्हणजे 12 महिन्याच्या कालावधीसाठी रक्कम पंचायत समिती, उदगीर यांचेकडे रोखवहीमध्ये शिल्लक असल्याचे दिसून येते.

2) त्या शिल्लक रकमेचा ताळमेळ घेऊन तातडीने कार्यवाही करणेबाबत सर्व संबंधीत जबाबदार अधिकारी यांना सुचना देणे बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देशित केले आहे. विकास कामे व विकास योजनासांठी निधी खर्च केल्यानंतर शिल्लक राहिलेला निधी याचा वेळोवेळी आढावा घेऊन अल्पमुदतीच्या ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्याबाबत शासनाच्या सुचना आहेत. तथापि वरील तपशीलानुसार पंचायत समिती उदगीर यांनी प्रदिर्घ कालावधी पासून विविध योजनाच्या अखर्चित निधी पंचायत समिती स्तरावर ठेवण्यात आलेला आहे. उक्त निधीची गुंतवणूक वेळीच केली असती तर जिल्हा परिषदेस (भविष्य निर्वाह निधीच्या) व्याजावर अनुज्ञेय असलेले व्याज दर 8 टक्के प्रमाणे रुपये 40,43,048/- व्याज मिळाले असते व सदर व्याजाची रक्कम जिल्हा परिषदेस विकास कामासाठी वापरता आली असती. तथापि, पंचायत समिती, उदगीर यांनी अशी रक्कम प्रदिर्घ कालावधीपासून विविध योजनांची रक्कम गट स्तरावर अनावश्यकरित्या ठेवून घेतल्यामुळे जिल्हा परिषदेचे वित्तीय नुकसान झालेले आहे याबाबत जबाबदारी निश्चित होऊन पूर्तता अहवाल दर्शवावा.

**4.668 विविध लेखाशीर्षाखाली झालेल्या जादा प्रदान वसुलीच्या रक्कमा शासन खाती भरणा केल्या नाहीत.**

**पंचायत समिती चाकूर, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 3) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 40 (1) नुसार अतिप्रदानाची केलेली वसुली ही त्याच वित्तीय वर्षातील असेल तर संबंधित तपशीलवार लेखाशीर्षाखाली चालू वर्षाच्या खर्चामधून वजा करून समायोजित करावी. परंतु, अशा प्रकारची कोणतीही कार्यवाही पंचायत समितीने केलेली नाही.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 40 (2) नुसार अतिप्रदानाची केलेली वसुली ही नंतरच्या वित्तीय वर्षातील असेल तर संबंधित प्रधान जमा लेखाशीर्षाखाली करण्यात येतील. पंचायत समितीने सन 2016-2017 या वित्तीय वर्षात हस्तांतर योजनेखाली रक्कम रुपये 2,14,739/- व अतिप्रदानाची वसुली झालेली आहे. सदर अतिप्रदानाची एकूण वसुली रक्कम रुपये 2,14,739/- शासन खाती भरणा करणे आवश्यक असताना त्या पंचायत समिती स्तरावर पडून आहेत.

3) मागील सर्व वर्षाचा सर्व रोखवहीचा या मुद्याच्या अनुषंगाने आढावा पंचायत समितीने घ्यावा व सदरील अतिप्रदानाच्या रक्कमा काढून शासन खाती भरणा करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा.

**4.669 पंचायत समिती, देवणी येथील आर्थिक व्यवहारात अनियमितता करुन अपहार केलेबाबत.**

**पंचायत समिती देवणी, जिल्हा लातूर, सन 2016-2017 (परिच्छेद क्रमांक 25) -** दिनांक 29/09/2016 रोजी हस्तांतर योजना रोजकिर्द नमुना नंबर 7 वर धनादेश क्रमांक 3798, रुपये 2,98,500/- अल्पबचत भरणा व धनादेश क्रमांक 3799, रुपये 5,00,060/- भविष्य निर्वाह निधी नोंदी दर्शवून श्री. रासूरे अजित बाबूराव (कनिष्ठ सहायक लेखा) यांनी RTGS द्वारे स्वत:च्या खात्यावर रक्कम वर्ग करुन एकूण रुपये 7,98,560/- अपहार केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 29/09/2016 रोजी हस्तांतर योजना खाते क्रमांक 106910119009315 (लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा देवणी) गट विकास अधिकारी याचे खात्यावरील रुपये 2,98,500/- अल्पबचत भरणा व रुपये 5,00,060/- भविष्य निर्वाह निधीच्या रकमा कर्मचाऱ्याच्या खात्यावर जमा करणेसाठी आर.टी.जी.एस. प्रणालीद्वारे श्री. रासूरे ए.बी.(कनिष्ठ सहायक लेखा) यांनी स्वत:च्या खाते क्रमांक 9110100391195 (ॲक्सीस बँक शाखा औसा रोड लातूर) येथे जमा करून स्वत:च्या कामासाठी रुपये 7,98,560/- खर्च करून अपहार केला आहे.

2) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 49 व 57 नुसार नमुना नंबर 7 मध्ये रोजकिर्द ठेवून दररोज बंद करुन त्यावर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी होणे आवश्यक आहे तसेच महिन्याच्या शेवटी रोखकीर्दीची शिल्लक व बँक शिल्लक यांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. काही चुकीच्या नोंदीमुळे तफावत आढळून आल्यास तात्काळ दुरुस्ती करून ताळमेळ घालणे आवश्यक होते. तसेच तीन महिन्यांच्या जास्त कालावधीसाठी न वटलेल्या धनादेशाबाबत का वटले नाहीत, याची शहानीशा करून बँक ताळमेळाच्या प्रतीसह मासिक लेखे मुख्य लेखा व वित्त अधिकारी याचेकडे सादर करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 57 नुसार नमुना नंबर 7 मध्ये रोजकिर्द ठेवून दररोज बंद करुन त्यावर गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी होणे आवश्यक आहे. रोखकीर्दीची तपासणीत दिनाक 01/06/2016 पासून प्रतिदिनी रोजकीर्द बंद करून कोठेही गटविकास अधिकारी यांची स्वाक्षरी आढळून आलेली नाही. त्यामुळे दिनाक 01/06/2016 पासून कार्यरत असलेले सहायक लेखाधिकारी, वरिष्ठ लेखाधिकारी व गटविकास अधिकारी यांचे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते तसेच बँक ताळमेळ न घातल्याने व प्रतिदिनी लेखा बंद न करून अखेरची शिल्लक न काढल्याने वित्तीय अनियमितता झालेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 42/50व 57 नुसार किरकोळ रोकडवही नमुना नंबर 4 ठेवून नोंदी घेणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक महिन्याच्या शेवटी रोख रकमेची पडताळणी करून शिल्लक रकमेचा गोषवारा किर्दमध्ये नोंदवून रोकड वही नमुना नंबर 4 अद्यावत करणे आवश्यक आहे. तसेच दिनांक 08/08/2016 ते दिनांक 15/10/2016 या कालावधीतील रोकडवही लिहिलेली नाही व दिनांक 01/06/2016 पासून शिल्लक रोख रकमेची पडताळणी करून गटविकास अधिकारी यांनी प्रमाणपत्र रोकड वहीत नोंदविलेले नाही. तसेच महिन्याच्या शेवटी रोखकीर्दीची शिल्लक व बँक शिल्लक यांचा ताळमेळ घेणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केलेली नाही.

4) उपरोक्त अपहाराबाबतचा अंतर्गत लेखापरीक्ष अहवाल पंचायत समिती, देवणी यांनी अर्धसमासपत्र क्रमांक 02, दिनांक 25/10/2017, क्रमांक 03, दिनांक 27/10/2017, क्रमांक 04 दिनांक 07/11/2017, क्रमांक 05, दिनांक 20/11/2017, क्रमांक 06, दिनांक 21/11/2017 एकूण 5 अर्धसमासपत्र देऊनही लेखापरीक्षणास उपलब्ध केलेला नाही. तेव्हा जिल्हा परिषद स्तरावरुन सदरील व याप्रमाणे इतर व्यवहाराची अंतर्गत लेखापरीक्षक पथकाकडून तपशीलवार तपासणी करावी. तसेच संबंधितांवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी. तसेच अपहारीत रक्कम दंडनीय व्याजासह वसूल करुन शासन खाती भरणा केल्याचे अनुपालन दर्शवावे

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 36 (2) नुसार अशी अनियमितता पुन्हा होणार नाहीत. यासाठी कोणती उपाययोजना केली, याबाबत साधार लेख्याधारे खुलासा व्हावा.

6) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 42 नुसार नमुना नंबर 7 व नमुना नंबर 4 ची रोखीची गणना, अनपेक्षित तपसणी, व तीन महिन्यातून एकदा रोखीची तपासणी /गणना समकक्ष अधिकरी यांनी करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही झालेली नाही. याबाबत खुलासा सादर करुन अनुपालन दर्शवावे.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 मधील नियम 37 नुसार प्रत्येक मागणी रक्कम देण्यापूर्वी वित्त विभागात व गट विकास अधिकारी यांनी धनादेश व त्यासोबत जोडलेली यादी तपासून मंजूर करणे आवश्यक आहे. गट विकास अधिकरी यांनी धनादेशावर स्वाक्षरी करत असताना देय प्रमाणकावरील खाते नंबरची तपासणी करणे आवश्यक होते. तशी कार्यवाही झालेली नाही. याबाबत खुलासा सादर करुन अनुपालन दर्शवावे.